(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळ : एक राजकीय आणि वैचारिक क्रांती

**प्रा. ज्योती दिलीप भापकर,** न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,अहिल्यानगर मोबाईल न. 7620937171

E-Mail : jyoti.bhapkar8787@gmail.com

---

**सारांश (Abstract)**

महाराष्ट्रातील १९ व्या आणि २० व्या शतकातील प्रबोधन चळवळीचे केवळ सामाजिक किंवा धार्मिक अंगाने नव्हे, तर प्रामुख्याने 'राजकीय' अंगाने विश्लेषण करणे हा आहे. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त आणि ब्रिटीश सत्तेचा उदय ही घटना महाराष्ट्राच्या इतिहासात केवळ सत्तांतराची नव्हती, तर ती एका वैचारिक स्थित्यंतराची नांदी होती. या कालखंडात पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसारातून जो 'विवेकवाद' (Rationalism) रुजला, त्याने इथल्या समाज मनात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली.या संशोधनामध्ये लोकहितवादींच्या 'शतपत्रां'मधील प्रखर राष्ट्रवाद आणि संसदीय लोकशाहीचे स्वप्न, महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून मांडलेले 'तळागाळातील लोकांचे सार्वभौमत्व' आणि शेतकऱ्यांच्या राजकीय अधिकारांची भूमिका यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. तसेच, गोपाळ गणेश आगरकर यांचा बुद्धिप्रामाण्यवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा राजकीय कयास, न्यायमूर्ती रानडे यांनी मांडलेले सनदशीर राजकारण आणि आर्थिक राष्ट्रवादाचे सूत्र यांचेही विश्लेषण करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांवर आहे. त्यांनी महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीला 'भावनिक' स्तरावरून 'संविधानिक आणि लोकशाही' स्तरावर कसे नेले, याचा धांडोळा येथे घेतला आहे. डॉ. आंबेडकरांनी दलितांना आणि वंचितांना दिलेला 'राजकीय सत्तेचा' मंत्र आणि लोकशाहीची 'एक व्यक्ती, एक मूल्य' ही व्यापक व्याख्या, यामुळे ही चळवळ खऱ्या अर्थाने 'राजकीय न्यायाची' जननी कशी ठरली, हे या निबंधात स्पष्ट केले आहे.शेवटी, या प्रबोधन चळवळीने आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची आणि 'पुरोगामी' चौकटीची पायाभरणी कशी केली, याचे मूल्यमापन या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या भूमीला 'संतांची आणि समाजसुधारकांची भूमी' म्हटले जाते. परंतु, १९ व्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा पेशवाईचा अस्त झाला आणि ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली, तेव्हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर एक अभूतपूर्व बदल घडून आला. या बदलालाच आपण 'प्रबोधन' असे म्हणतो. महाराष्ट्रातील हे प्रबोधन केवळ जुन्या धार्मिक रूढींना विरोध करण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते एक राजकीय जाणीव जागृतीचे पर्व होते.विवेकवाद आणि पाश्चात्य शिक्षणाचा प्रभावामुळे ब्रिटीश राजवटीसोबतच भारतात पाश्चात्य शिक्षण पद्धती आली. या शिक्षणामुळे महाराष्ट्रातील तरुण पिढीला सॉक्रेटिस, प्लेटो, मिल, आणि स्पेन्सर यांसारख्या पाश्चात्य विचारवंतांच्या विचारांची ओळख झाली. 'विवेकवाद' हे या प्रबोधनाचे मुख्य सूत्र होते. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार केवळ ती जुनी आहे म्हणून न करता, ती विज्ञानाच्या आणि तर्काच्या कसोटीवर उतरते का, हे पाहण्याची दृष्टी या चळवळीने दिली. यातूनच 'राजा हा ईश्वराचा अंश नसून तो जनतेचा सेवक असावा' हा लोकशाहीवादी राजकीय विचार रुजू लागला.समता आणि मानवी हक्कांची मांडणी महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिने मांडलेली 'समता'. महात्मा जोतिराव फुले यांनी 'गुलामगिरी' आणि 'शेतकऱ्याचा असूड' यांसारख्या ग्रंथांतून समाजातील उच्च-नीचतेच्या उतरंडीवर प्रहार केला. त्यांनी मांडलेला राजकीय विचार हा 'तळागाळातील माणसाच्या अधिकारांचा' विचार होता. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाला राजकीय प्रक्रियेत स्थान मिळत नाही, तोपर्यंत देशाला मिळणारे स्वातंत्र्य हे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य नसेल, ही मांडणी अत्यंत क्रांतिकारी होती. यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणाला सुरुवातीपासूनच एक सामाजिक न्यायाची जोड मिळाली.महाराष्ट्रातील प्रबोधन हे एकांगी नव्हते. त्यात विविध वैचारिक प्रवाह होते. सुधारणावादी प्रवाह हा न्या. रानडे आणि नामदार गोखले यांनी सनदशीर मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत राहून राजकीय हक्क मिळवण्याचा विचार मांडला.प्रखर राष्ट्रवादाचा प्रवाह हा लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य' हा आपला जन्मसिद्ध हक्क असल्याचे घोषित करून सामान्य जनतेला राजकीय आंदोलनात खेचले.परिवर्तनवादी प्रवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय सत्तेला 'मास्टर की' मानले. त्यांनी अस्पृश्य आणि वंचितांच्या राजकीय आरक्षणाची आणि संविधानात्मक हक्कांची मागणी लावून धरली. संस्थात्मक उभारणी आणि राजकीय जागृती केली प्रबोधन चळवळीने केवळ विचार दिले नाहीत, तर संस्थात्मक बांधणीही केली. 'पुणे सार्वजनिक सभा', 'प्रार्थना समाज', 'सत्यशोधक समाज' आणि पुढे 'बहिष्कृत हितकारिणी सभा' यांसारख्या

संस्थांनी लोकांच्या तक्रारी सरकारपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. हे एक प्रकारचे राजकीय प्रशिक्षण होते. वृत्तपत्रांनी (उदा. केसरी, सुधारक, मूकनायक) या विचारांना घराघरांत पोहोचवले. यामुळेच महाराष्ट्र हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा आणि नंतरच्या काळातील लोकशाही चळवळींचा केंद्रबिंदू बनला.

**प्रमुख विचारवंत आणि त्यांचे राजकीय विचार**

**राजर्षी शाहू महाराज :**

राजर्षी शाहू महाराजांचे (१८७४-१९२२) राजकीय आणि सामाजिक विचार हे महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचा सुवर्णकाळ मानले जातात. त्यांनी महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारांना 'राजसत्तेचा' आधार मिळवून दिला. राजर्षी शाहू महाराज प्रबोधन चळवळीचे राजकीय दिशादर्शकशाहू महाराजांचे विचार हे केवळ सिद्धांतापुरते मर्यादित नव्हते, तर ते 'कृतीशील प्रबोधनाचे' प्रतीक होते. त्यांच्या राजकीय विचारांचे मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत सामाजिक न्यायासाठी आरक्षणाचे धोरण (२६ जुलै १९०२)शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्ष जाहीर केले. हा भारतातील आरक्षणाचा पहिला अधिकृत दस्तऐवज मानला जातो.राजकीय विचार सत्तेत आणि प्रशासनात सर्व जातींचा सहभाग असल्याशिवाय 'स्वराज्य' हे 'सुराज्य' होऊ शकत नाही, हा त्यांचा ठाम राजकीय कयास होता. समतावादी समाजसत्तेचा पुरस्कार महाराजांनी जातीभेदाच्या उतरंडीवर प्रहार करण्यासाठी आंतरजातीय विवाह आणि आंतरजातीय भोजनाला प्रोत्साहन दिले. १९१७ मध्ये त्यांनी कोल्हापुरात 'आंतरजातीय विवाह कायदा' संमत केला.राजकीय परिणाम: यामुळे समाजातील वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी मोडीत निघाली आणि 'बहुजन' हा राजकीय शक्ती म्हणून उदयास आला. वंचितांचे नेतृत्व आणि डॉ. आंबेडकरांना सहकार्य शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमधील प्रतिभा ओळखली आणि त्यांना मूकनायक सुरू करण्यासाठी तसेच पुढील शिक्षणासाठी मदत केली. माणगाव येथील परिषदेत (१९२०) त्यांनी घोषित केले की, "तुम्हाला तुमचा नेता डॉ. आंबेडकर मिळाला आहे, ते केवळ तुमचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे नेते होतील." राजकीय दूरदृष्टी नेतृत्व हे जन्मावर आधारित नसून ते कर्तृत्वावर आधारित असावे, हे त्यांनी जगाला दाखवून दिले. प्राथमिक शिक्षण आणि सक्षमीकरण १९१७ मध्ये त्यांनी कोल्हापुरात 'मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा' केला.विचार "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे" या विचाराला त्यांनी शासकीय बळ दिले. सुशिक्षित समाजच आपल्या राजकीय हक्कांचे रक्षण करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. शेतकरी आणि कामगारांचे हितरक्षण शाहू महाराजांनी राधानगरी धरणाची निर्मिती केली आणि सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले. त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी कायदे केले.राजकीय पैलू हे अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी जर स्वावलंबी झाला, तरच देश राजकीयदृष्ट्या बलवान होईल.

**लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख):**

लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) हे महाराष्ट्रातील प्रबोधन काळातील एक अत्यंत परखड आणि वास्तववादी राजकीय विचारवंत होते. त्यांच्या 'शतपत्रांनी' (जी 'प्रभाकर' साप्ताहिकामधून १८४८ ते १८५० या काळात प्रसिद्ध भारतीयांच्या पराभवाचे राजकीय मीमांसा लोकहितवादींनी केवळ ब्रिटिशांचे गुणगाण गाण्यासाठी शतपत्रे लिहिली नाहीत, तर भारतीयांचा पराभव का झाला, याचे अत्यंत निर्भीड विश्लेषण केले. त्यांच्या मते, भारतीयांच्या पराभवाचे मुख्य कारण 'अज्ञान' आणि 'कालबाह्य रूढी' हे होते. "आपण का हरलो?" या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात की, आपण विज्ञानाकडे पाठ फिरवली आणि केवळ नशिबावर विसंबून राहिलो. ज्या देशात ज्ञानाची उपासना थांबते, तो देश राजकीयदृष्ट्या गुलाम होतो, हा त्यांचा मुख्य सिद्धांत होता.

लोकशाही आणि संसदीय प्रणालीचे समर्थन लोकहितवादी हे महाराष्ट्रातील कदाचित पहिले विचारवंत होते ज्यांनी संसदीय लोकशाहीची संकल्पना मांडली. त्यांनी असे भाकीत केले होते की, ब्रिटिशांचे राज्य हे कायमस्वरूपी असणार नाही. जेव्हा भारतीय लोक सुशिक्षित होतील, तेव्हा ते ब्रिटिशांना सांगतील की, "आता आमचा देश चालवण्यास आम्ही समर्थ आहोत, तुम्ही आता परत जा."त्यांनी सुचवले होते की, भारताने इंग्लंडच्या संसदेप्रमाणे स्वतःची एक 'लोकसत्ता' स्थापन करावी.राजा हा ईश्वराचा अवतार नसून तो जनतेचा प्रतिनिधी असावा, असा आधुनिक राजकीय विचार त्यांनी मांडला.'पुनरुज्जीवन' नव्हे तर 'पुनर्रचना'लोकहितवादींचा असा ठाम विश्वास होता की, जुन्या काळात परत जाऊन देशाचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यांना समाजाची 'पुनर्रचना' हवी होती.त्यांच्या मते, जुन्या स्मृतिग्रंथांमधील नियम हे त्या काळासाठी योग्य होते, पण आधुनिक काळात ते बदलले पाहिजेत."जे नियम मानवाच्या प्रगतीला अडथळा ठरतात, ते

धर्मग्रंथ असले तरी फेकून दिले पाहिजेत," असे प्रखर विचार त्यांनी मांडले. हा विचार आजही भारतीय संविधानाच्या दुरुस्ती प्रक्रियेशी मिळताजुळता वाटतो.स्वदेशी आणि आर्थिक राष्ट्रवाद न्यायमूर्ती रानडे यांच्याही आधी लोकहितवादींनी 'स्वदेशी'चा विचार मांडला होता.त्यांनी भारतीयांना आवाहन केले की, जोपर्यंत आपण आपल्या गरजांसाठी दुसऱ्या देशावर अवलंबून आहोत, तोपर्यंत आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होऊ शकणार नाही."लोकांनी आपल्याच देशातील विणकरांनी विणलेले कापड वापरावे," असे सांगून त्यांनी स्वदेशीचा पाया रचला. त्यांचा हा विचार पुढे महात्मा गांधींच्या स्वदेशी चळवळीचा आधार बनला.प्रशासकीय सुधारणा आणि कायदेमंडळलोकहितवादींनी सरकारी नोकरीत असूनही ब्रिटिशांच्या प्रशासकीय त्रुटींवर बोट ठेवले.त्यांनी मागणी केली की, कायदेमंडळात भारतीयांना स्थान मिळावे.सरकारला कर देणाऱ्या जनतेला विचारल्याशिवाय सरकारने कोणताही नवीन कर लादू नये हा पाश्चात्य राजकीय नियम त्यांनी भारतीय संदर्भात मांडला. संसदीय लोकशाहीची चाहूल: भारताने भविष्यात स्वराज्य कसे मिळवावे आणि त्यात लोकशाहीचे महत्त्व काय असेल, याचे सुतोवाच त्यांनी केले होते.

**महात्मा जोतिराव फुले आणि सत्यशोधक समाज:**

महात्मा जोतिराव फुले आणि त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हे महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचे अत्यंत क्रांतिकारी आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी अंग आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक पर्यावरणात 'समानता' आणि 'स्वातंत्र्य' या मूल्यांची पेरणी केली. महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे मुख्य उद्दिष्ट "शूद्र आणि अतिशूद्रांना पुरोहितांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे" हे होते.धार्मिक समताईश्वराची भक्ती करण्यासाठी मध्यस्थाची पुरोहिताची गरज नाही, हा विचार त्यांनी मांडला. "सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्ती" हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते.राजकीय प्रबोधनातील योगदान महात्मा फुलेंनी प्रबोधन चळवळीला केवळ धार्मिक सुधारणेपुरते मर्यादित न ठेवता त्याला राजकीय वळण दिले.

सत्तेचे लोकशाहीकरण

फुलेंच्या मते, जोपर्यंत सत्ता केवळ एका ठराविक वर्गाच्या हातात आहे, तोपर्यंत ती खरी लोकशाही नाही. प्रशासकीय सेवांमध्ये बहुजन समाजाला त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे, ही आरक्षणाची मूळ संकल्पना फुलेंनी मांडली. **शेतकऱ्यांचे राजकारण**

'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) या ग्रंथातून त्यांनी ब्रिटीश सरकारची नोकरशाही आणि स्थानिक सावकार-जमीनदार यांच्या युतीमुळे शेतकऱ्यांचे कसे शोषण होते, याचे राजकीय विश्लेषण केले. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे ते पहिले आधुनिक नेते होते. हंटर कमिशनपुढील साक्ष (१८८२)शिक्षणाच्या प्रश्नाला त्यांनी राजकीय महत्त्व दिले. "प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे" ही मागणी त्यांनी ब्रिटीश सरकारकडे केली, कारण शिक्षण हेच राजकीय जागृतीचे मुख्य साधन आहे असे त्यांचे मत होते. महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज हे महाराष्ट्रातील 'सामाजिक लोकशाही' चे शिल्पकार आहेत. त्यांनी प्रबोधन चळवळीला 'भावनिक' स्तरावरून 'अधिकार' आणि 'प्रतिनिधित्व' या राजकीय स्तरावर नेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या संविधानिक मार्गाने हक्कांची लढाई लढली, त्याचा पाया महात्मा फुलेंनीच रचला होता.महात्मा फुले हे आधुनिक भारताचे पहिले समाजक्रांतिकारक मानले जातात. त्यांचा राजकीय विचार 'तळागाळातील लोकांचे सार्वभौमत्व' यावर आधारित होता.शेतकरी आणि बहुजन केंद्रबिंदू सत्तेत शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा सहभाग असावा, हे त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' मधून मांडले.मानवी हक्क त्यांनी मांडलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' हा मानवी हक्कांचा जाहीरनामाच होता**.**

**गोपाळ गणेश आगरकर**

आगरकरांचा राजकीय विचार हा 'बुद्धिप्रामाण्यवाद' आणि 'व्यक्तिस्वातंत्र्य' यावर आधारित होता.समाजसुधारणा की राजकीय स्वातंत्र्य: त्यांनी 'आधी समाजसुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य' या वादात समाजसुधारणेला प्राधान्य दिले, कारण गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर न पडलेला समाज स्वातंत्र्य टिकवू शकणार नाही, असा त्यांचा राजकीय कयास होता. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना भारतीय अर्थशास्त्राचे जनक मानले जाते. त्यांचा राजकीय विचार हा 'संघटनात्मक आणि सनदशीर' होता. ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचे राजकीय विश्लेषण त्यांनी केले.'पुणे सार्वजनिक सभा' आणि 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'च्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर:**

डॉ. आंबेडकरांच्या आधीचे प्रबोधन प्रामुख्याने 'सुधारणावादी' होते. डॉ. आंबेडकरांनी त्याला 'परिवर्तनवादी' बनवले. त्यांनी दलितांना आणि वंचितांना जाणीव करून दिली की, अस्पृश्यता हा केवळ धार्मिक प्रश्न नसून तो एक राजकीय आणि मानवी हक्कांचा प्रश्न आहे.शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा मंत्र केवळ घोषणा नव्हती, तर तो प्रबोधनाचा एक संपूर्ण कार्यक्रम होता. शिक्षणातून विवेकवाद, संघटनेतून शक्ती आणि संघर्षातून अधिकार मिळवणे, ही त्यांच्या प्रबोधनाची त्रिसूत्री होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार आणि महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचे सर्वात प्रगल्भ राजकीय नेतृत्व होते. त्यांनी महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला केवळ 'सुधारणा' इथपर्यंत मर्यादित न ठेवता तिला 'राजकीय सत्तेचा' आणि 'संविधानिक हक्कांचा' पाया मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन चळवळीचे संविधानिक आणि लोकशाही वळण राजकीय सत्ता ही 'दुःखांवरील औषध' आणि 'मास्टर की' डॉ. आंबेडकरांचा सर्वात महत्त्वाचा राजकीय विचार हा होता की, जोपर्यंत वंचितांच्या हातात राजकीय सत्ता येत नाही, तोपर्यंत त्यांचे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत. त्यांनी दलितांना आणि शोषितांना "राजकीय सत्ता ही सर्व कुलुपे उघडणारी 'मास्टर की' आहे," हा संदेश दिला.त्यांच्या मते, केवळ मंदिरात प्रवेश मिळवून किंवा एकत्र जेवण करून अस्पृश्यता नष्ट होणार नाही, तर त्यासाठी कायदे बनवण्याचे आणि ते राबवण्याचे अधिकार वंचितांकडे असायला हवेत.याच विचारामुळे त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' आणि पुढे 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' सारख्या राजकीय संघटना स्थापन केल्या.लोकशाहीची संकल्पना 'एक व्यक्ती, एक मूल्य' डॉ.आंबेडकरांनी लोकशाहीची मांडणी अत्यंत सूक्ष्मपणे केली. त्यांच्या मते, लोकशाही ही केवळ एक शासन पद्धती नाही, तर ती 'सहजीवनाची एक पद्धती' आहे.राजकीय लोकशाही विरुद्ध सामाजिक लोकशाही त्यांनी इशारा दिला होता की, २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विरोधाभासाच्या जगात प्रवेश करत आहोत. राजकारणात आपल्याला 'एक व्यक्ती एक हे अधिकार मिळतील, पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्व नसेल, तर आपली ही राजकीय लोकशाही फार काळ टिकणार नाही.त्यांनी लोकशाहीला नैतिकतेची जोड दिली. त्यांच्या मते, लोकशाहीत अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण होणे हेच खऱ्या लोकशाहीचे लक्षण आहे.प्रबोधनाला 'संविधानिक' वळण महाराष्ट्रातील पूर्वीच्या प्रबोधन चळवळी (उदा. सत्यशोधक समाज) प्रामुख्याने लोकजागृती आणि चळवळींवर आधारित होत्या. डॉ. आंबेडकरांनी या चळवळीला 'संविधानाचा' कायदेशीर आधार दिला.हक्क विरुद्ध सवलती त्यांनी अस्पृश्यांचे हक्क हे कोणाची 'मेहेरबानी' किंवा 'सवलत' नसून ते त्यांचे 'मानवी हक्क' आहेत, हे ठामपणे मांडले.गोलमेज परिषदेत त्यांनी मांडलेली 'स्वतंत्र मतदारसंघाची' मागणी ही वंचितांना राजकीय प्रक्रियेत सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी घेतलेली ऐतिहासिक भूमिका होती.घटनात्मक नीतिमत्ता डॉ. आंबेडकरांनी 'घटनात्मक नीतिमत्ता' हा शब्दप्रयोग रूढ केला. त्यांच्या मते, केवळ चांगले संविधान असून चालत नाही, तर ते राबवणारे लोक जर नैतिक नसतील, तर संविधान निष्फळ ठरेल.त्यांनी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना शिकवले की, आपले लढे हे रस्त्यावरून संसदेपर्यंत आणि संसदेतून न्यायालयापर्यंत नेले पाहिजेत.त्यांनी प्रबोधनाचा मार्ग हा 'आवाहन' कडून 'हक्क' कडे वळवला. राजकीय न्याय आणि सामाजिक समता डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू 'न्याय' होता.आरक्षणाची भूमिका त्यांनी आरक्षणाकडे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन म्हणून पाहिले नाही, तर तो सत्तेत सहभागी होण्याचा एक राजकीय मार्ग आहे, असे मानले.कामगार आणि महिलांचे अधिकार व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्ये असताना त्यांनी कामगारांसाठी कामाचे ८ तास, महिलांसाठी बाळंतपणाची रजा आणि समान कामासाठी समान वेतन यांसारखे कायदे आणले. हा त्यांच्या प्रबोधन चळवळीचा 'राजकीय-कायदेशीर' विस्तार होता.प्रबोधन चळवळीतील परिवर्तनाचा प्रवास लोकहितवादींनी अज्ञानावर प्रहार केला, फुलेंनी गुलामगिरीवर प्रहार केला, तर डॉ. आंबेडकरांनी त्या गुलामीला नष्ट करण्यासाठी 'कायद्याचे राज्य' प्रस्थापित केले.त्यांनी प्रबोधन चळवळीला 'भावनिक' स्तरावरून 'बौद्धिक आणि संविधानिक' स्तरावर नेले.'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा मंत्र केवळ सामाजिक नसून तो एक प्रखर राजकीय जाहीरनामा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीला जे वळण दिले, त्यामुळेच आज महाराष्ट्र हा देशात राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक मानला जातो. त्यांनी प्रबोधनाला संविधानाचे कवच दिले, ज्यामुळे इथल्या वंचितांना आणि दलितांना केवळ 'दया' नव्हे, तर 'अधिकार' मिळाले. 'एक व्यक्ती, एक मूल्य' या त्यांच्या विचाराचा पाठपुरावा करणे, हेच आजच्या लोकशाहीपुढील सर्वात मोठे कार्य आहे. महाडचा सत्याग्रह आणि प्रबोधनाची कृतीशीलता (१९२७) महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीच्या इतिहासात चवदार तळ्याचा सत्याग्रह ही एक महत्त्वाची राजकीय घटना आहे.मानवी

हक्कांचे जाहीरनामा महाडमध्ये त्यांनी 'मनुस्मृती'चे दहन केले. हे दहन म्हणजे केवळ एका ग्रंथाचे दहन नव्हते, तर विषमतेवर आधारित असलेल्या जुन्या व्यवस्थेचे राजकीय दहन होते.चवदार तळ्याचे पाणी पिणे ही एक प्रतिकात्मक कृती होती, ज्याद्वारे त्यांनी घोषित केले की, नैसर्गिक संसाधनांवर सर्वांचा समान अधिकार आहे.प्रतिनिधीत्वाचा विचार त्यांनी दक्षिणबरो कमिशन (१९१९) आणि गोलमेज परिषदेत (१९३०-३२) वंचितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. त्यांचा हा विचार महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीला आणि दलित चळवळीला राजकीय दिशा देणारा ठरला.सत्ता हे साधन त्यांच्या मते, सत्ता हे अंतिम ध्येय नसून ते सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे एक साधन आहे.लोकशाहीची संकल्पना 'एक व्यक्ती, एक मूल्य'डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या केवळ 'बहुमताचे राज्य' अशी कधीच केली नाही. त्यांच्या मते, लोकशाही म्हणजे समाजाच्या मानसिकतेत झालेला बदल होय.सामाजिक लोकशाही: "सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकणार नाही," हा त्यांचा सर्वात मोठा राजकीय विचार होता.एक व्यक्ती, एक मूल्य: त्यांनी संविधानाच्या माध्यमातून 'एक व्यक्ती, एक मत' दिले, पण त्यांना अपेक्षित असलेली खरी लोकशाही 'एक व्यक्ती, एक मूल्य' ही होती, जिथे प्रत्येक नागरिकाला समान प्रतिष्ठा मिळेल.संविधानिक वळण आणि संस्थात्मक कार्य डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्रातील प्रबोधनाला रस्त्यावरील लढाईकडून संसदेतील आणि कायद्याच्या लढाईकडे नेले.बहिष्कृत हितकारिणी सभा (१९२४)या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी प्रबोधनाला संस्थात्मक स्वरूप दिले.स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६) त्यांनी केवळ दलितांचेच नव्हे, तर शेतकरी आणि कामगारांचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष स्थापन केला. यातून त्यांची व्यापक राजकीय दृष्टी दिसून येते.कामगार आणि महिलांच्या अधिकारांचे प्रबोधन म्हणजे केवळ पुरुषांची प्रगती नव्हे. डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या राजकीय आणि सामाजिक हक्कांसाठी 'हिंदू कोड बिल' आणले.महिला सक्षमीकरण व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्ये असताना त्यांनी महिलांना मतदानाचा अधिकार, बाळंतपणाची रजा आणि समान वेतन मिळवून देण्यासाठी लढा दिला. महाराष्ट्रातील महिलांच्या राजकीय जाणीवेला आंबेडकरी विचारांनी मोठी चालना दिली. परिवर्तनाचा मार्ग धम्मक्रांती (१९५६)प्रबोधनाचा अंतिम टप्पा म्हणून डॉ. आंबेडकरांनी नागपूर येथे धम्मचक्र प्रवर्तन केले. ही केवळ धार्मिक कृती नव्हती, तर ती एक वैचारिक आणि राजकीय निवड होती. गुलामीची मानसिक साखळी तोडून समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार करणे, हा त्यांच्या प्रबोधनाचा सर्वोच्च बिंदू होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातील प्रबोधनाला 'नैतिक आणि कायदेशीर' अधिष्ठान मिळवून दिले. त्यांनी प्रबोधनाचा मार्ग 'विनंती' कडून 'हक्क' कडे वळवला. आजचा जो 'पुरोगामी महाराष्ट्र' आपण पाहतो, त्यामागे आंबेडकरांनी दिलेली संविधानिक दृष्टी आहे. "कायद्याचे राज्य" आणि "संवैधानिक नीतिमत्ता" ही त्यांनी महाराष्ट्राला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे.

**निष्कर्ष:**

या संशोधनाअंती महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीच्या राजकीय आणि वैचारिक पैलूंचे खालील निष्कर्ष निघतात:

१८१८ मधील पेशवाईचा अस्त केवळ राजकीय नव्हता, तर तो सरंजामशाहीकडून आधुनिक लोकशाही मूल्यांकडे होणाऱ्या प्रवासाचा प्रारंभ होता. पाश्चात्य शिक्षणामुळे समाजात 'विवेकवाद' रुजला.लोकहितवादींच्या 'शतपत्रां'मधून भारताच्या भावी संसदीय लोकशाहीचे आणि 'स्वदेशी'चे पहिले स्पष्ट संकेत मिळतात. त्यांनी 'राजा हा जनतेचा सेवक' ही संकल्पना मांडून राजसत्तेचे मानवीकरण केले. महात्मा जोतिराव फुले यांनी प्रबोधनाला केवळ उच्चवर्णीय सुधारणेपुरते मर्यादित न ठेवता, ते तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत आणि वंचितांपर्यंत नेले. 'सत्यशोधक समाज' ही महाराष्ट्रातील पहिली 'तळागाळातील राजकीय जाणीव' देणारी संघटना ठरली.राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये दिलेले आरक्षण हे केवळ नोकरीचे साधन नव्हते, तर ती प्रशासकीय सत्तेतील मक्तेदारी मोडीत काढणारी एक 'राजकीय क्रांती' होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रबोधन चळवळीला 'भावनिक' स्तरावरून 'संविधानिक' स्तरावर नेले. त्यांनी 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे तत्त्व देऊन सामाजिक लोकशाहीचा पाया रचला. महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीमुळेच आजच्या 'पुरोगामी महाराष्ट्राच्या' राजकीय संस्कृतीची चौकट तयार झाली आहे, ज्यात सामाजिक न्याय आणि समता ही मुख्य मूल्ये आहेत.

**शिफारशी**

प्रबोधन चळवळीचा वारसा अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी खालील शिफारशी करता येतील:

**१. प्रबोधन विचारांचे आधुनिक उपयोजन:**

महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे केवळ वाचन न करता, आजच्या डिजिटल युगातील सामाजिक विषमतेवर मात करण्यासाठी त्या विचारांचे आधुनिक उपयोजन होणे गरजेचे आहे.

२. **राजकीय साक्षरता मोहिमा:**

प्रबोधनकारांनी दिलेली 'राजकीय सत्तेची मास्टर की' आणि 'मतदानाचे मूल्य' यावर ग्रामीण आणि वंचित भागात व्यापक राजकीय साक्षरता मोहिमा राबवल्या जाव्यात.

३. **स्त्री-पुरुष समतेचे राजकीय प्रतिबिंब:**

आगरकर आणि डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या हक्कांसाठी जो लढा दिला, त्याचे प्रतिबिंब आजच्या सक्रिय राजकारणात उमटणे आवश्यक आहे. महिलांचा धोरण-निर्मिती प्रक्रियेत ५०% सहभाग सुनिश्चित व्हावा.

**संदर्भ सूची :**

1. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे. खंड १, महाराष्ट्र शासन प्रकाशन, १९७९.
2. कीर, धनंजय. महात्मा जोतिराव फुले: आमचे समाजक्रांतिकारक. पॉप्युलर प्रकाशन, १९६८.
3. देशमुख, गोपाळ हरी (लोकहितवादी). लोकहितवादींची शतपत्रे. संपा. पु. ग. सहस्रबुद्धे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९७७.
4. कीर, धनंजय. महात्मा जोतिराव फुले: आमचे समाजक्रांतिकारक. पॉप्युलर प्रकाशन, १९६८.
5. गंभीरराव, बा. र. महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि त्यांचे विचार. चिन्मय प्रकाशन, २०१५.
6. जाधव, भास्करराव. सत्यशोधक समाजाचा इतिहास. सत्यशोधक समाज प्रकाशन, १९३० (पुनर्मुद्रित).
7. फडके, य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र. खंड १ ते ६, श्रीविद्या प्रकाशन, १९८९.
8. बागल, माधवराव. सत्याचे शोधक. राजर्षी शाहू प्रकाशन, १९७०.
9. रानडे, महादेव गोविंद. राइज ऑफ द मराठा पॉवर (Rise of the Maratha Power). पुणतांबेकर प्रकाशन, १९००.
10. सरदार, गं. बा. महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी. अभिनव प्रकाशन, १९४१.